राज्यातील चारा लागवड क्षेत्रात व चारा उत्पादनात वाढ, चाऱ्याची गुणवत्ता व चाऱ्याचे मुल्यवर्धन करण्याकरिता राज्यस्तरीय कृती दल स्थापन करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक: डीएएचडी-१४०३४/१९/२०२३ डीएएचडी-एएच-४ (E-६७७००१)**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- २० नोव्हेंबर, २०२३

**वाचा :-** सचिव, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, केंद्र शासन, यांचे अ. शा. पत्र क्रमांक आर-२४०१८/२६/२०२३-डीआयआर-एएनएलएम (ई- २५७७६) दि.०६.०९.२०२३

राज्यातील दुधाळ पशुधनाच्या उत्पादकतेच्या संदर्भात देशाच्या व देशातील दुध उत्पादनात अग्रेसर असलेल्या पंजाब राज्यातील पशुधनाच्या दुध उत्पादकतेबाबतची तुलनात्मक स्थिती पुढीलप्रमाणे आहे.

*(लिटर / प्रतिदिन)*

| दुधाळ जनावरांचा प्रकार | देश पातळी | पंजाब | महाराष्ट्र |
|---|---|---|---|
| देशी गायी | ३.३६ | ९.१७ | २.३४ |
| संकरीत गायी | ८.५२ | १३.८८ | १०.३८ |
| म्हशी | ५.९६ | ९.५६ | ५.३३ |

वरील विवरणपत्राचे अवलोकन केले असता राज्यातील पशुधनाची उत्पादन क्षमता ही पंजाब राज्यापेक्षा सुमारे दुप्पटीने कमी आहे. त्यामुळे राज्यातील दुधाळ पशुधनाची उत्पादनक्षमता वाढविण्यास भरपूर वाव आहे. पशुधनाची दुध उत्पादनक्षमता वाढविण्याकरीता पशुंच्या स्वास्थ्याबरोबरच पशुधनास पुरेसा सकस व समतोल आहार यांची अत्यंतिक गरज आहे.

सामान्य पर्जन्यमानाच्या स्थितीत हिरव्या चाऱ्याच्या बाबतीत ४४ टक्के व वाळलेल्या चाऱ्याच्या बाबतीत २५ टक्के तूट असल्याचे खालील आकडेवारीवरुन स्पष्ट होत आहे.

*(लक्ष मे. टन)*

| **चाऱ्याचा प्रकार** | **वार्षिक आवश्यकता** | **वार्षिक उपलब्धता** | **वार्षिक तुट** | **तुटीची टक्केवारी** |
|---|---|---|---|---|
| **हिरवी वैरण** | १३३४.१३ | ७४७.३८ | ५८६.७५ | ४३.९८ |
| **वाळलेली वैरण** | ४२५.७७ | ३२१.०५ | १०७.७२ | २५.१२ |

राज्यात चारा पिकाच्या लागवडीखालील कमी होत असलेले क्षेत्र, पशुधनाची संख्या व उत्पादित होणारा चारा विचारात घेता यात सामान्य पर्जन्यमानाच्या स्थितीत असलेल्या तूटीत टंचाईच्या काळात अधिक भर पडते. यावर उपाययोजना सुचविण्यासाठी “राज्यस्तरीय कृतीदल” गठित करण्याची विनंती केंद्र शासनाने त्यांच्या पत्र क्रमांक आर-२४०१८/२६/२०२३-डीआयआर-एएनएलएम (ई- २५७७६) दि.०६/०९/२०२३ अन्वये केली आहे. त्यानुसार राज्यस्तरीय कृती दल स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील चा-याची कमतरता कमी करण्याच्या दृष्टीकोनातून तसेच राज्यातील पशुधनास पुरेसा सकस व समतोल चारा उपलब्ध करण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. राज्यात सध्या अंमलात असलेल्या केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचा आढावा घेणे व चा-याची तुट भरुन काढण्याच्यादृष्टीने योग्य उपाययोजना करण्यासाठी आवश्यक निधीच्या स्त्रोतासह नविन योजना तयार करण्यासाठी पुढीलप्रमाणे **"राज्यस्तरीय कृतीदल"** स्थापन करण्यास याद्वारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे.:-

| | | |
|---|---|---|
| १. | अपर मुख्य सचिव, कृषी विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई. | |
| २. | अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग (वने), महाराष्ट्र राज्य, मुंबई. | |
| ३. | प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई. | |
| ४. | सचिव, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई. | |
| ५. | उपायुक्त वैरण विकास, पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य सचिव |

कार्यदलाने आपला अहवाल तीन महिन्यात शासनास सादर करावा.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असुन त्याचा सांकेतांक २०२३११२०१५४५०४७९०१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NIWRUTTI BHAGUJI MARALE

Digitally signed by NIWRUTTI BHAGUJI MARALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT, 2.5.4.20=8a75c414ff50ce35220c63cd53d2eb1a99a474c02300beea74bb051c4c3c90a9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5C891DA87D2A4842558454524CC114BA5B2F67A2A80796592830D345500F15CC, cn=NIWRUTTI BHAGUJI MARALE
Date: 2023.11.20 15:45:10 +05'30'

**( नि.भा.मराळे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत-**

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय मुंबई
२. मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव, मंत्रालय मुंबई
३. मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई
४. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
५. अपर मुख्य सचिव, कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई
६. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग (वने), मंत्रालय, मुंबई
७. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
८. उपसंचालक (वैरण विकास) पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे.
९. मा.मंत्री (पशुसंवर्धन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई
१०.निवडनस्ती पदुम-४.